घेऊन आम्ही हा नवा उपक्रम राबविला आहे.

## उल्लेखनीय नवीनसेवा -

डिमांड ड्राफ्ट, एम्. एस्. ई. बी. ची बीले व पाणी बीलाबरोबरच नवीन सेवा सुरु केल्या त्यामध्ये बी. एस्. एन. एल्. ची लँडलाईन व मोबाईल बीले कलेक्शन सेंटर मा. खा. राजू शेट्टी यांच्या हस्ते उद्घाटन करून सुरू केले आहे. शिवाय वेस्टर्न मनी ट्रान्सफर ही आंतरराष्ट्रीय चलनाची देव-घेव सेवा आमच्याकडे सुरू आहे.

## श्री. वसंतराव चौगुले इंग्लिश मेडीयम स्कूल -

**श्री. वसंतराव चौगुले इंग्लिश मेडीयम स्कूल** दिवसेंदिवस प्रगती करीत आहे. प्रवेश घेतांना पालक प्रथम पसंती देत आहेत. सद्या शाळेकडे ३४० विद्यार्थी ज्ञानार्जनाचा लाभ घेत आहेत. आगामी वर्षात शाळेची स्वतःची इमारत बांधण्याचे नियोजन चालू आहे.

## भेटी आभार व समारोप -

सन २००८/२००९ मध्ये संस्थेस खा. राजू शेट्टी अध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना, आ. महादेवराव महाडीक, मा. श्री. व्ही. डी. कटांबळे, माजी प्राचार्य शहाजी कॉलेज, मा. श्री. निनाद बेडेकर, इतिहास संशोधक पुणे, मा. श्री. प्रा. आप्पासाहेब खोत कोडोली विद्यालय कोडोली, युनीयन बँक शाखाधिकारी, कोल्हापूर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन मार्गदर्शन केले. तसेच विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, जिल्हाउपनिबंधक सहकारी संस्था, उपनिबंधक सहकारी संस्था शहर, सहाय्यक निबंधक करवीर, कागल, हातकणंगले, शाहूवाडी, पन्हाळा, गडहिंग्लज. या कार्यालयाकडील सर्व अधिकारी व स्टाफ, संबंधीत बँका व त्यांचा स्टाफ, सहकारी संचालक, चौगुले परिवार, सभासद बंधू-भगिनी, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक व सेवक या सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. यापुढे असेच सहकार्य द्यावे ही विनंती करून आपणासमोर ठेवलेल्या अहवालास मंजुरी द्यावी ही विनंती.

॥ जय सहकार ॥

कोल्हापूर

आपला विश्वासू,

दिनांक : - ०७/०८/२००९

श्री. अनिल आपगोंडा पाटील

चेअरमन